महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

**Maharashtra State Board of Secondary & Higher,Pune Divisional Board,**
**Pune - 411005**

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | FAX - 020 / 25536761 |
| --- | --- | --- |
| 25536722 | 25536781 / 82 / 83 25536712 | E-MAIL sscboardpune@gmail.com |


**स्मरणपत्र/अंतिम महत्वाचे**

क्रमांक:पुविमं/यो.प्र./२०१९/1658
पुणे ४११ ००५
दि. १०/०८/२०२०

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त
कनिष्ठ महाविद्यालये
पुणे/नगर/सोलापूर

**विषय:-** इयत्ता १२वी विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जांच्या कागदपत्रांच्या त्रुटीपूर्ततेबाबत....
**संदर्भ:-** आपणाकडून शैक्षणिक वर्ष १९-२० मध्ये प्राप्त झालेले परराज्य/परदेशी विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज.

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२१ ला प्रविष्ठ होणा-या परंतु इयत्ता १०/११वी परीक्षा परराज्य/परदेशी संस्थांमधून उत्तीर्ण झालेल्या किंवा इयत्ता ११ वी अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज आपणाकडून मंडळास सादर करण्यात आलेले आहेत. परंतु अदयापही सदर अर्जासमवेत आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेली नाही. विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या त्रुटीपूर्ततेबाबत आपणास यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे तरी सदर कागदपत्रांच्या सत्यप्रती व मूळ स्थलांतर प्रमाणपत्र प्रत्यक्ष मंडळ कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावे.

सदर कागदपत्रांची पूर्तता तातडीने ३१ ऑगस्ट २०२० पर्यत करण्यात यावी. अन्यथा संबंधित विद्यार्थ्यांच्या होण्या-या शैक्षणिक नुकसानीस पूर्णपणे कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहिल याची नोंद घ्यावी.

सोबत: कनिष्ठ महाविद्यालय यादी जोडलेली आहे.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५.